# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१.
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट ३६४-२२ दिनांक ३०/११/२०२२

## मोटार सायकल व रिक्षा चोरी करणाऱ्या आरोपीस अटक करुन ४ मोटार सायकल व ३ रिक्षा हस्तगत करण्यात नालासोपारा पोलीसांना यश.

दिनांक ११/१२/२०२१ रोजी २२.०० वाजता ते दिनांक १२/११/२०२१ रोजी रोजी सकाळी ०९.०० वाजताचे दरम्यान फिर्यादी यांनी त्यांची टी.व्ही.एस जुपीटर मोटार सायकल क्र. एम.एच.४८/ बी.झेड.४७७७ ही नालासोपारा पश्चिम एस.टी. डेपो येथे लॉक करुन पार्क केलेली असतांना ती कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरी करुन घेवून गेला होता. फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नालासोपारा पोलीस ठाणेस गु.र.क्र. ५७०/२०२१ भा.दं.वि.सं कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

सदर गुन्हयाचा उघडकीस येण्याकरिता नालासोपारा पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाकडून सतत प्रयत्न चालू असतांना त्यांना गोपनीय बातमीदाराकडून माहिती मिळाली की, एका इसमाकडे चोरीची मोटार सायकल असून तो नालासोपारा स्टेशन परिसरात येणार आहे, मिळालेल्या बातमीप्रमाणे स्टेशन परिसरात सापळा रचून संशईत नामे संजय लालमन यादव, वय २९ वर्षे, पत्ता- रुम क्र-०३, लक्ष्मी निवास चाळ, जे.बी.एस स्कूल, अलकापूरी, नालासोपारा (पूर्व), ता-वसई, जि-पालघर यास ताब्यात घेऊन त्याचेकडे केलेल्या तपासात त्याचे जवळ असलेली मोटार हि नमुद गुन्हयातील असल्याचे कबूल केल्याने त्यास सदर गुन्हयात दि २७/११/२०२२ रोजी अटक करण्यात आली आहे.

आरोपी पोलीस कोठडीमध्ये असतांना त्याचेकडे केलेल्या कौशल्यपूर्ण तपासात त्याने आणखी वसई व मुंबई परिसरातून मोटार सायकली व रिक्षा चोरी केल्याची कबूली देऊन त्याचेकडून खालीलप्रमाणे ४ मोटारसायकल व ३ रिक्षा पंचनाम्याद्वारे जप्त करुन **एकूण ५,००,०००/- रुपये** किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

| अनु.क्र | किंमत | हस्तगत मालमत्ता |
|---|---|---|
| ०१ | ५०,०००/- | एक सफेद रंगाची टी.वी.एस कंपनीची मोटर स्कूटर क्र- MH 48 BZ 4777, इंजिन क्र GG5LL1600474, चेसीस क्र - MD626EG58L1L00396 **(नमुद गुन्हयातील मालमत्ता)** |
| ०२ | ६०,०००/- | HONDA UNICORN- CHASIS NO- ME4KCO9MCG8012166, ENGINE NO-KC09E87012036 **(माणिकपूर पोलीस ठाणे गु.नो.क्र ४२०/२२ कलम ३७९ भा.दं.वि )** |
| ०३ | ४०,०००/- | SUPER SPLENDOR – CHASIS NO- MBLJAWO93K9D29344, ENGINE NO-JA05EGK9E39630 **(बोरीवली पोलीस ठाणे, मुंबई. गु.नो.क्र १२१९/२२ कलम ३७९ भा.दं.वि )** |
| ०४ | १,००,०००/- | RIKSHAW –MH47 AJ 6476, CHASIS NO- MD2A27AY8KWD75403 , ENGINE NO- AZYWKD90386 **(दहिसर पोलीस ठाणे गु.नो.क्र १६६०/२२ कलम ३७९ भा.दं.वि )** |

| | | |
|---|---|---|
| ०५ | १,००,०००/- | RIKSHAW – MH 02 CT 8764, CHASIS NO- MDZA24AZ6DWH12869, ENGINE NO- 24ZWDH65392<br>**(बोरीवली पोलीस ठाणे, मुंबई. गु.नो.क्र १४५८/२२ कलम ३७९ भा.दं.वि )** |
| ०६ | १,००,०००/- | RIKSHAW – ENGINE NO- 24YWHH49868, CHASIS NO- MD2A24AY9HWH31963 |
| ०७ | ५०,०००/- | Bajaj Pulsur- Silver, CHASIS NO- DHVBKG26640, ENGINE NO- DHGBKG26222 |

सदरची कामगिरी श्री सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०३, श्री चंद्रकांत जाधव, सहा. पो.आयुक्त नालासोपारा, यांचे मार्गदर्शनाखाली श्री विलास सूपे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नालासोपारा पोलीस ठाणे, श्री राहुल सोनावणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), सपोनि/पंडीत म्हस्के, सपोनि/अमोल तळेकर, पोहवा/किशोर धनु, पोना/अमोल तटकरे पोशि/कल्याण बाचकर, पोशि/राजेश नाटुलकर यांनी केलेली आहे.

